Let the mind manage the body
Que l'esprit gère le corps

**MARATHI**
**(Subject code No. P190)**

**Index Number:** ..................................................

# MAURITIUS EXAMINATIONS SYNDICATE

## Primary School Achievement Certificate Assessment

**2023**

**Time: 1 hour 45 minutes** **Total Marks: 100**

**INSTRUCTIONS TO CANDIDATES**


1. Check that this assessment booklet contains **9** questions printed on **15** pages.
2. Write your Index Number on the assessment booklet in the space provided above.
3. You should not use red, green or black ink in answering questions.
4. Write all your answers clearly in the assessment booklet.
5. Attempt **all** questions.

| Question | Marking | | | Revision | | | Control | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Marks | | Sig | Marks | | Sig | Marks | | Sig |
| 1A | | | | | | | | | |
| 1B | | | | | | | | | |
| 2A | | | | | | | | | |
| 2B | | | | | | | | | |
| 3 | | | | | | | | | |
| 4A | | | | | | | | | |
| 4B | | | | | | | | | |
| 5A | | | | | | | | | |
| 5B | | | | | | | | | |
| 6 | | | | | | | | | |
| 7A | | | | | | | | | |
| 7B | | | | | | | | | |
| 8 | | | | | | | | | |
| 9 | | | | | | | | | |
| **Total** | | | | | | | | | |
| **Sig (HoG)** | | | | | | | | | |


© Mauritius Examinations Syndicate

Marks


**Question 1A (5 marks)**
**चित्र ओळखा आणि नाव लिहा. एक उदाहरण दिलेले आहे.**




बाटली
___________________




___________________




___________________



___________________



___________________



___________________

| |
|---|
| M |
| R |
| HG |
| QC |
| CE |



Please turn over


Marks

**Question 1B (5 marks)**
**योग्य वाक्य आणि चित्र जुळवा. एक उदाहरण दिलेले आहे.**


टपालवाला सुनीलला एक पत्र देत आहे.



आम्हाला समुद्रकाठी जाण्यास आवडते.




पोलिसाने एका चोराला पकडले.




विमान आकाशात उडत आहे.



मांजर आनंदाने खेळत आहे.



दररोज माझा भाऊ शाळेला जातो.



| M |
|---|
| R |
| HG |
| QC |
| CE |

Marks

**Question 2A (10 marks)**

**खाली दिलेल्या उत्तरांपैकी योग्य उत्तराच्या वर्णाभोवती वर्तुळ काढा. एक उदाहरण दिलेले आहे.**

**उदाहरणः** मांजर दूध _________.

अ. पित      (ब.) पिते

क. पी      ड. पिता

१. _________ नवा झगा सुंदर आहे.

अ. ताईची      ब. ताईचे

क. ताईचा      ड. ताईच्या

२. केवीन आणि त्याचे बाबा फटफटी _________.

अ. चालवतात      ब. चालवते

क. चालवतो      ड. चालवता

३. राज आजारी होता _________ तो कामाला गेला.

अ. मग      ब. कारण

क. म्हणून      ड. तरीही

४. घंटा वाजली की मुले _________ लागली.

अ. खाऊ      ब. खातात

क. खा      ड. खातो

५. _________ नेहमी हॉटेलात सुट्टी घालवण्यास जाता.

अ. आम्ही      ब. ते

क. तुम्ही      ड. त्या

Marks

६. माझी चप्पल तुटली ________ ती जुनी होती.

अ. म्हणून                    ब. की

क. कारण                    ड. पण

७. _________ अनेक रंगीबेरंगी फुले आहेत.

अ. फुलदाणीने                    ब. फुलदाणीत

क. फुलदाणी                    ड. फुलदाण्या

८. _________ वाजता कार्यक्रम सुरू होईल?

अ. किती                    ब. कोण

क. केव्हा                    ड. का

९. कुत्र्याच्या पिल्ल्याच्या _________ लागले.

अ. पाय                    ब. पायाने

क. पायाला                    ड. पायाची

१०. पुढच्या शनिवारी जतिन सिनेमाला _________.

अ. जाते                    ब. जाईल

क. जाऊ                    ड. जाता

| |
|---|
| M |
| R |
| HG |
| QC |
| CE |

Marks

**Question 2B (5 marks)**

**खाली दिलेल्या उत्तरांपैकी योग्य उत्तराच्या वर्णाभोवती वर्तुळ काढा.**

१. मला अतिशय __________ लागली आहे. मला थोडे पाणी द्याल का?

अ. भूक    ब. तहान

क. राग    ड. आनंद

२. मीरा आपले पुस्तक सगळीकडे __________ आहे. तिला ते कोठेही सापडत नाही.

अ. लिहीत    ब. विकत घेत

क. शोधत    ड. धुवत

३. आज खूप __________ आहे. मला गरम चहाचा एक कप पाहिजे.

अ. थंडी    ब. अंधार

क. ऊन    ड. सुंदर

४. आज __________ बंद आहे. सर्व विद्यार्थी घरीच राहतील.

अ. दुकान    ब. शाळा

क. बँक    ड. बाजार

५. माझ्या वडिलांची __________बंद पडली. ते बसने कामाला जातील.

अ. विमान    ब. मोटार

क. नाव    ड. आगगाडी

| M |
|---|
| R |
| HG |
| QC |
| CE |



Please turn over

Marks

**Question 3 (10 marks)**

**खालील पोस्टर वाचा आणि त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**बेचू माधू सरकारी शाळा**

**जलदिन**

जलदिनानिमित्त बेचू माधू सरकारी शाळा काही कार्यक्रम आयोजित करीत आहे.

**तारीखः** २२ मार्च २०२३

**वेळः** ०९ ते १२ वाजता

सहावीचे विद्यार्थी खालील कार्यक्रमांत भाग घेतीलः

- शाळेजवळच्या नदीची साफसफाई
- ‘पाणी’ या विषयावर निबंध लेखनाची स्पर्धा


पाणी अतिशय महत्त्वाचे आहे. पुढील कार्यांसाठी पाणी आवश्यक आहेः

- पिणे
- रोपट्यांना पाणी घालणे

जर तुम्हाला वरील कार्यक्रमांत भाग घेण्याची इच्छा असेल तर सौ. विनिता, शाळेच्या मुख्याध्यापिकांना तुमचे नाव द्या.

तुमचे नाव देण्यासाठी शेवटची तारीख २० मार्च २०२३ आहे. तुमच्या पालकांची परवानगी असणे जरूरी आहे.

अधिक माहिती मिळवण्यासाठी ४२६७५३४ या नंबरवर फोन करा.



Marks

**पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. कोणत्या शाळेने हे पोस्टर तयार केले आहे?

_______________________________________________ [1]

२. कोणत्या दिनानिमित्त हे पोस्टर तयार करण्यात आले आहे?

_______________________________________________ [1]

३. कोणत्या तारखेला हे कार्यक्रम आयोजण्यात आले आहेत?

_______________________________________________ [1]

४. कोणत्या वर्गातील विद्यार्थी या कार्यक्रमात भाग घेतील?

_______________________________________________ [1]

५. ज्याच्यामध्ये विद्यार्थी भाग घेऊ शकतील, अशा दोन कार्यक्रमांची नावे लिहा.

(i) _______________________________________________

(ii) _______________________________________________ [2]

६. पाणी आवश्यक का आहे? एक कारण लिहा.

_______________________________________________ [1]

७. मुख्याध्यापिकेचे नाव काय आहे?

_______________________________________________ [1]

८. जर तुम्हाला भाग घेण्याची इच्छा असेल तर कोणाची परवानगी असणे जरूरी आहे ?

_______________________________________________ [1]

९. शाळेचा फोन नंबर काय आहे?

_______________________________________________ [1]

| M |
|---|
| R |
| HG |
| QC |
| CE |



Please turn over

Marks

## Question 4 (15 marks)

**खालील उतारा वाचा आणि दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

शांती आणि अरूण जिवलग मित्र होते. वर्गात ते एकमेकांजवळ बसत. रोज दुपारी ते एकत्र घरी परत जायचे. शांतीच्या मित्रमैत्रिणींना ती खूप आवडायची कारण ती एक चांगली मुलगी होती.

एके दिवशी शांती शांतपणे वर्गात शिरली. ती नेहमीप्रमाणे हसत नव्हती.
"कोणी तुझ्यावर रागावले का?" अरूणने तिला विचारले. शांतीने उत्तर दिले नाही. ती आपल्या जागेवर जाऊन बसली आणि तिने वर पाहिलेच नाही.
काही वेळानंतर शिक्षिकेने शांतीला बोलावले. शांतीने पुन्हा उत्तर दिले नाही. शिक्षिकेने ह्या वेळी तिचे नाव मोठ्याने घेतले. तेव्हा शांतीने फक्त आपला हात उचलला.
"तू का बोलत नाहीस?" शिक्षिकेने विचारले. शांतीने काहीही सांगितले नाही. शिक्षिकेला वाटले की कदाचित शांती आजारी असेल.
"तू बरी आहेस का?" शिक्षिकेने तिला विचारले. तुला डॉक्टरकडे जायचे का? डोके हालवून* शांतीने 'नाही' म्हटले.
"शांती, काय झाले तुला?" अरूणने विचारले. शांतीचे इतर मित्रमैत्रिणी तिला प्रश्न विचारू लागले.
"तुझा धाकटा भाऊ बरा आहे ना?" मिलाने विचारले.
"तुझा कुत्रा ठीक आहे का?" सरिताने विचारले.
"तुझी आजी तर बरी आहे ना?" विनोदने विचारले.
शांतीने प्रत्येक वेळी डोके हालवून* 'होय' म्हटले. पण तिने अजून आपले डोके वर केले नाही.
अचानक अरूणला एक युक्ती सुचली. त्याला शांतीला हसवायचे होते. त्याने आपल्या पिशवीतून काहीतरी बाहेर काढले आणि शांतीवर ते फेकले. ते म्हणजे उंदराचे एक मोठे खेळणे होते. आधी शांती घाबरून गेली. पण मग जेव्हा तिने पाहिले की ते उंदराचे एक खेळणे होते तेव्हा ती हसू लागली.

त्या वेळी अरूण आणि तिच्या इतर मित्रमैत्रिणींना समजले की ती दिवसभर बोलली नाही कारण तिचे समोरचे चार दात पडले होते.

(* डोके हालवणे – Shook her head)

Marks

**Question 4A (5 marks)**

**खाली दिलेल्या उत्तरांपैकी योग्य उत्तराच्या वर्णाभोवती वर्तुळ काढा.**

१. रोज शांती __________बरोबर घरी परतायची.

अ. मिला

ब. सरिता

क. अरूण

ड. विनोद

२. सर्वांना शांती आवडायची कारण ____________________________.

अ. तिला एक कुत्रा होता.

ब. ती एक चांगली मुलगी होती.

क. ती हळूहळू चालायची.

ड. ती शांत स्वभावाची होती.

३. जेव्हा शांतीने उत्तर दिले नाही तेव्हा _______________________________.

अ. शिक्षिका तिच्यावर रागावली.

ब. शिक्षिकेने डॉक्टरला फोन केला.

क. शिक्षिका मोठ्याने बोलली.

ड. ती हसू लागली.

४. जेव्हा शिक्षिकेने शांतीला दुसऱ्यांदा हाक मारली तेव्हा ______________________.

अ. तिने आपला हात उचलला.

ब. ती खाली पाहत होती.

क. ती हसली.

ड. ती घरी गेली.

५. शांतीने आपले डोके वर उचलले नाही कारण ______________________.

अ. ती आजारी होती.

ब. तिला राग आला होता.

क. तिला बोलण्याची इच्छा नव्हती.

ड. ती हसत होती.

| M |
|---|
| R |
| HG |
| QC |
| CE |

Marks

**Question 4B (10 marks)**

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. वर्गात शांती कोणाजवळ बसत असे?

______________________________ [1]

२. शांतीने काहीही सांगितले नाही तेव्हा शिक्षिकेला काय वाटले?

______________________________ [1]

३. कोणी शांतीला पुढील बाबतीत विचारले?

(i) तिचा भाऊः ______________________________ [1]

(ii) तिचा कुत्राः ______________________________ [1]

(iii) तिची आजीः ______________________________ [1]

४. अरूणने शांतीला हसवण्यासाठी काय केले?

______________________________

______________________________ [1]

५. संपूर्ण दिवस शांती का बोलली नाही?

______________________________ [1]

**६. पुढील वाक्ये उताऱ्यानुसार योग्य क्रमात लिहा. पहिले वाक्य देण्यात आले.**

- शांती हसू लागते. [ ]
- अरूण आपल्या पिशवीतून एक खेळणे काढतो. [ ]
- शांती वर्गात येते. [ १ ]
- शिक्षिका शांतीला बोलावते. [ ]

[3]

| |
|---|
| M |
| R |
| HG |
| QC |
| CE |

Marks

**Question 5A (4 marks)**

**वाक्ये दिलेल्या सूचनेप्रमाणे लिहा.**

**(अ) खालील शब्द योग्य क्रमाने लिहून वाक्ये लिहा.**

१. दहावा – आज - आहे – वाढदिवस – मनिषचा

_______________________________________________

_______________________________________________

२. सकाळी –विकतो – फळवाला – फळे – रोज – ताजी

_______________________________________________

_______________________________________________

M | R | HG | QC | CE

**Question 5B (6 marks)**

**(ब) खाली दिलेली अपूर्ण वाक्ये पूर्ण करा.**

१. शानिया लवकर उठते आणि ______________________________

_______________________________________________

२. जेव्हा बाबांना सुट्टी मिळेल तेव्हा ______________________________

_______________________________________________

३. परवा दादा पोर्ट लुईसला गेला कारण ______________________________

_______________________________________________

M | R | HG | QC | CE



Please turn over

Marks

**Question 6 (10 marks)**

**खालील गोष्ट वाचून मोकळया जागी योग्य शब्द भरा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **खाली** | **वारा** | **पाहायला** | **पडेल** | **भीती** |
| **पालकांनी** | **छोटे** | **शूर** | **मारली** | **कधीही** |

एके दिवशी एक छोटा पक्षी आपल्या वडिलांना म्हणाला, "मला उडायचे नाही. मला खूप _________ वाटते". त्याच्या वडिलांनी त्याला न घाबरता उडण्याचा प्रयत्न करायला सांगितले. लवकरच त्यांचे घरटे* त्यांच्यासाठी अगदी _________ पडेल. छोट्या पक्ष्याने झाडावरून _________ पाहिले. "झाड खूपच उंच आहे. मला _________ उडता येणार नाही," असे त्याला वाटले.




तसेच जोराचा _________ वाहत होता. त्याला वाटले की तो जमिनीवर खाली _________.

काही वेळानंतर त्याच्या आईने त्याला खाली न _________ सांगितले. तिने त्याला _________ व्हायला सांगितले. त्याच्या _________ त्याला एकटेच उडायला सांगितले. शेवटी छोट्या पक्ष्याने घरट्याबाहेर उडी _________. अखेरीस त्याला उडता आले!

| |
|---|
| M |
| R |
| HG |
| QC |
| CE |

Marks

**Question 7A (5 marks)**

**खाली दिलेल्या वाक्यात काही चुकीचे शब्द अधोरेखित आहेत. कंसातील मोकळया जागी त्या शब्दाचे योग्य रूप लिहा.**

१. आई सैपाकघरात **<u>जवण</u>** तयार करते. (__________)

२. संजीव **<u>मावसीबरोबर</u>** दुकानाला गेला होता. (__________)

३. डोंगराजवळ दोन **<u>नदी</u>** खळखळ वाहतात. (__________)

४. रोज सकाळी **<u>काळी</u>** समुद्रावर जाऊन मासे पकडतो. (__________)

५. सणाच्या दिवशी आम्ही नवे कपडे **<u>घालता</u>**. (__________)

| M |
|---|
| R |
| HG |
| QC |
| CE |

**Question 7B (5 marks)**

**कंसातील शब्दांचे योग्य रूप लिहून वाक्ये पूर्ण करा.**

१. माझे आजोबा (राग) ___________ स्वभावाचे आहेत.

२. मामी (कच्चा) ___________ कैरी घेऊन लोणचे बनवते.

३. दादाने समोरचे दार (जोर) ___________ बंद केले.

४. पावसाळ्यात सगळीकडे शेते (हिरवा) ___________ दिसतात.


५. शिक्षक फळ्यावर (निळा) ___________ खडूने लिहितो.

| M |
|---|
| R |
| HG |
| QC |
| CE |

Marks

**Question 8 (10 marks)**

**खाली दिलेल्या प्रत्येक चित्रावर एक वाक्य लिहून गोष्ट लिहा. तुम्हाला दिलेल्या शब्दांचाच वापर करावा.**



एके दिवशी – समुद्रकाठी

______________________________

______________________________



पोहोचल्यावर – जेवण घेणे

______________________________

______________________________



अचानक – पाऊस

______________________________

______________________________



लवकर – सामान

______________________________

______________________________



शेवटी – घर

______________________________

______________________________

| M |
|---|
| R |
| HG |
| QC |
| CE |

Marks

## Question 9 (10 marks)

**दिलेल्या मुद्यांच्या आधारे सुमारे १०० शब्दांचा एक निबंध लिहा.**

- सहकुटुंब बाजाराला जाणे.
- भाज्या विकत घेणे.
- अचानक एक माणूस मदत मागणे.
- तुम्ही आणि तुमचे कुटुंब काय करता?
- शेवटी काय होते?

| M |
|---|
| R |
| HG |
| QC |
| CE |

Marks

| M |
| --- |
| R |
| HG |
| QC |
| CE |

**BLANK PAGE**